# <u>प्रेस नोट</u>

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **प्रशांत महादेव बानोले, वय ५३ वर्ष, व्यवसाय सिव्हील इंजिनिअर, रा. गांधी चौक, शेगाव (खाजगी ईसम)** |
| लाच मागणी | १,००,०००/— रुपये तडजोडीअंती ७५०००/— रुपये |
| लाच स्विकारली | ७५०००/— रुपये |
| घटनास्थळ | तक्रारदार यांचे राहते घर, शेगाव |
| घटना तारीख | ०७.०५.२०२५ रोजी |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या शेतीचे व्यावसायीक अकृषक (NA) प्रकरण नगररचना विभाग, बुलढाणा येथील अधिकारी कर्मचारी यांच्या मार्फत काम मंजुर करुन देण्यासाठी **प्रशांत महादेव बानोले**, सिव्हील इंजिनीअर यांनी तक्रारदार यांना १,००,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार दिनांक ०५.०५.२०२५ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, खाजगी ईसम **प्रशांत महादेव बानोले**, सिव्हील इंजिनीअर यांनी तक्रारदार यांचेकडुन तडजोडीअंती ७५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन ७५,०००/— रुपये स्विकारण्यास संमती दर्शविली. दिनांक ०७.०५.२०२५ रोजी आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान खाजगी ईसम **प्रशांत महादेव बानोले**, सिव्हील इंजिनीअर यांना ७५,०००/— रुपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. नमुद खाजगी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुद्ध लाच मागणी व लाच स्विकारलेबाबत पोलीस स्टेशन शेगाव शहर येथे अपराध क्रमांक २५७/२०२५ कलम 7A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदर कार्यवाही :—**

१.मा.श्री.मारुती जगताप,पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

२.मा.श्री.सचिंद्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

३.मा.श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा,

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक रमेश पवार, सापळा पथक पोहेकॉ. प्रविण बैरागी, पोहेकॉ. राजेंद्र क्षिरसागर, पोकॉ.रंजित व्यवहारे, चानापोकॉ/नितीन शेटे अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

(रमेश पवार)
पोलीस निरीक्षक ,
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलढाणा